


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ३०८ ●रविवार,दि.०८ फेब्रुवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# टी-२० विश्वचषकाचा शंखनाद ! वानखेडेवर टीम इंडियाची विजयी गर्जना




## अमेरिकेचा धुव्वा उडवत Point Table मध्ये खाते उघडले

**मुंबई । प्रतिनिधी**

आयसीसी टी-२० विश्वचषकाचा बिगुल आज वाजला आणि पहिल्याच सामन्यात टीम इंडियाने आपल्या घरच्या मैदानावर म्हणजेच वानखेडे स्टेडियमवर विजय मिळवला. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने अमेरिकेचा २९ धावांनी पराभव करत स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे. भारताने दिलेल्या १६१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना अमेरिकेचा संघ निर्धारित षटकांत १३२ धावांपर्यंतच मजल मारू शकला. यासह भारताने या स्पर्धेतील आपले पहिले दोन गुण खात्यात जमा केले.

### ● सूर्यकुमारचं वादळी अर्धशतक...

यानंतर रिंकू सिंग आणि हार्दिक पांड्यांकडूनही अपेक्षित कामगिरी झाली नाही. रिंकू सिंग ६ धावांवर मोहम्मद मोहसिनचा बळी ठरला, तर हार्दिक पंड्याला हरमीत सिंगने बाद केलं. हार्दिक आऊट झाला तेव्हा भारताचा स्कोअर ७७/६ असा झाला होता. येथून अक्षर पटेल आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी सातव्या विकेटसाठी ४१ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. अक्षर पटेल १४ धावा करून हरमीत सिंगचा बळी ठरला. अक्षर बाद झाल्यानंतर काही वेळातच सूर्यकुमार यादवने आपली अर्धशतकी खेळी पूर्ण केली. सूर्यकुमार यादव एकाकी झुंज देत क्रीजवर ठाम उभा राहिला. मात्र दुसऱ्या टोकाला अर्शदीप सिंग (४) आणि वरुण चक्रवर्ती (०) यांची विकेट्स पडत राहिल्या. सूर्यकुमार यादवने ४९ चेंडूमध्ये नाबाद ८४ धावांची जबरदस्त खेळी केली. या खेळीत त्याने १० चौकार आणि ४ षटकार लगावले. अमेरिकेकडून शॅडली वान शल्कविकने उत्कृष्ट गोलंदाजी करत २५ धावांत ४ विकेट्स घेतल्या, तर हरमीत सिंगला २ विकेट्स मिळाल्या.

### ● टॉप ऑर्डर पूर्णपणे ढेपाळली

**नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ९ विकेट्सच्या मोबदल्यात १६१ धावा केल्या. मात्र, टीम इंडियाची सुरुवात अत्यंत खराब ठरली. सलामीवीर अभिषेक शर्मा पहिल्याच चेंडूवर आऊट झाला. यानंतर ईशान किशन आणि तिलक वर्मा यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांनी काही आकर्षक फटकेही मारले, पण पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात शॅडली वान शल्कविकने सामन्याचं चित्रच बदलून टाकलं. षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर ईशान किशन (२० धावा) बाद झाला. पुढच्या दोन चेंडूवर तिलक वर्मा (२५) आणि शिवम दुबे (०) यांनाही माघारी पाठवले. शिवम दुबे बाद झाला तेव्हा भारताची धावसंख्या ४६/४ अशी होती.**

### ● अमेरिकेचा डाव १३२ धावांवर आटोपला

**पॉवरप्लेमध्येच यूएसएने तीन महत्त्वाच्या विकेट्स गमावल्या. येथून मिलिंद कुमार आणि संजय कृष्णमूर्ती यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांनी चौथ्या विकेटसाठी ५८ धावांची भागीदारी केला. मिलिंद कुमारने १०० स्ट्राईक रेटने ३४ धावा केल्या, ज्यात ३ चौकार आणि १ षटकार यांचा समावेश होता. मात्र, वरुण चक्रवर्तीने मिलिंदचा अडथळा संपवला. यानंतर मैदानावर फिरकीपटू अक्षर पटेलचा जादू पाहायला मिळाला. अक्षरने सलग चेंडूवर संजय कृष्णमूर्ती आणि हरमीत सिंग यांना बाद करत अमेरिकन डावाची कणा मोडली. संजयने २ चौकार आणि १ षटकारासह ३१ चेंडूत ३७ धावा केल्या, तर हरमीत सिंगला खातेही उघडता आलं नाही.**

# जपानच्या सागा प्रांताच्या गव्हर्नरच्या शिष्टमंडळाने घेतली पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची भेट

- नदी पुनरुज्जीवन आणि प्लास्टिकमुक्त जलस्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम
- जपानचे सहकार्य यासाठी मोलाचे- मंत्री पंकजा मुंडे
- पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण, दुग्ध व्यवसाय आदी विषयांवर झाली सविस्तर चर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची आज जपानमधील सागा प्रांताचे गव्हर्नर व उच्चस्तरीय शिष्टमंडळाने भेट घेऊन पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.नदी पुनरुज्जीवन आणि

▶▶ उर्वरित पान २ वर



### ● पर्यावरण मंत्री यांना जपानचे निमंत्रण

**प्लास्टिक व्यवस्थापनासाठी उभारण्यात येणाऱ्या वर्ल्ड ओशन प्लास्टिक प्लॅनिंग सेंटर या केंद्राला भेट देण्याचे निमंत्रण राज्यपाल यामागुची यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना दिले.**

# बोगस राजमा बियाणे देऊन व्यापाऱ्याची 13 लाखाला फसवणूक; साताऱ्याच्या 6 जणांवर गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राजमा बियाणे पुरवठा करण्याच्या नावाखाली अंबाजोगाई येथील एका बियाणे व्यापाऱ्याची १२ लाख ८० हजार २०० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात साताऱ्यातील 'येस फ्रेश फार्मर प्रोड्युसर कंपनी'च्या ६ संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंबाजोगाई येथील सुयश प्रेमचंद मुथा रा. गुरुवार पेठ, अंबाजोगाई हे बियाणे व्यवसायाचे काम पाहतात. जुलै २०२५ मध्ये साताऱ्याच्या 'यश फ्रेश फार्मर प्रोड्युसर कंपनी'चे संचालक संजय बाबासाहेब भगत आणि ओंकार संजय भगत यांनी मुथा यांची भेट घेऊन त्यांना राजमा बियाण्याचे उच्च दर्जाचे नमुने दाखवले होते.



त्यानुसार मुथा यांनी २१ जुलै २०२५ रोजी एकूण ८५ टन राजमा खरेदीचा करार केला आणि आरटीजीएसद्वारे वेळोवेळी रक्कम जमा केली. करारानुसार ठरलेला माल तपासण्यासाठी मुथा साताऱ्याला गेले असता, तिथे दाखवल्याप्रमाणे चांगल्या दर्जाचा माल उपलब्ध नव्हता. तडजोड म्हणून त्यांनी २५ टनाची नवीन ऑर्डर दिली आणि एकूण २६ लाख ३१ हजार रुपये जमा केले. मात्र, आरोपींनी ३० ऑगस्ट २०२५ रोजी केवळ १२ टन माल पाठवला,जो अत्यंत निकृष्ट दर्जाचा होता. त्यामध्ये भेसळ, माती आणि पेरणीसाठी अयोग्य साहित्य मोठ्या प्रमाणात होते. उर्वरित मालासाठी किंवा पैसे परत मिळवण्यासाठी मुथा यांनी वारंवार संपर्क केला असता, आरोपींनी पैसे देण्यास नकार दिला आणि अर्वाच्य भाषेत उत्तरे दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सुयश मुथा यांनी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी संजय बाबासाहेब भगत, ओंकार संजय भगत, अरविंद सोपान विधाते, सारीका सोमनाथ शिंदे, बालुताई सोमनाथ जगताप आणि बालकृष्ण पंढरीनाथ चव्हाण या ६ संचालकांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादीत मोठ्या हालचाली

## तटकरे यांच्या विधानामुळे विलीनीकरणाच्या चर्चेला नवे वळण



**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा अजित पवार यांच्या विमान अपघातातील दुर्दैवी निधनानंतर राज्यातील राजकारणात मोठ्या घडामोडींना वेग आला आहे. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर एकीकडे सत्तास्थैर्याचा संदेश देण्याचा प्रयत्न होत असतानाच, दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेने पुन्हा जोर धरला आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतील काही नेत्यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

### ● तटकरे नेमकं काय म्हणाले ?

**राष्ट्रवादीच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना सुनील तटकरे यांनी महत्त्वाचे संकेत दिले. आम्ही सर्वांनी मिळून अजितदादा यांच्या नेतृत्वाखाली एनडीएमध्ये जाण्याचा निर्णय घेतला होता. मात्र विलीनीकरणाच्या विषयावर आम्ही सखोल चर्चा करू, असे ते म्हणाले.**

## मोदी सरकारचा महाराष्ट्रातील राजकारण्यांना दणका...

# जिल्हा बँकांमधील 'परमनंट संचालकांची' मक्तेदारी संपुष्टात; केंद्राकडून नवीन कायदा लागू

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सहकारी आणि विशेषतः जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून वर्षानुवर्षे राजकारणाची धुरा सांभाळणाऱ्या संचालकांना नवीन बँकिंग सुधारणा कायद्याने मोठा धक्का दिला आहे. केंद्र सरकारने लागू केलेल्या 'बँकिंग कायदा (दुरुस्ती) - २०२५ नुसार, आता कोणत्याही सहकारी बँकेवर एका संचालकाला जास्तीत जास्त दहा वर्षेच काम करता येणार आहे. या कायद्याची सर्वांत कळीची बाब म्हणजे याची अंमलबजावणी 'पूर्वलक्ष्यी प्रभावाने होणार असल्याने, ज्या संचालकांनी आजवर सलग दहा वर्षे पूर्ण केली आहेत, त्यांना आगामी

▶▶ उर्वरित पान २ वर



### ● महाराष्ट्र सरकारची सावध भूमिका

**महाराष्ट्रातील निवडणूक प्राधिकरण हे स्वतंत्र कायद्याने चालते आणि राज्य सरकार किंवा बँकिंग नियमावलीत अद्याप अशा दहा वर्षांच्या मर्यादचा स्पष्ट उल्लेख नसल्याने सरकारची भूमिका बचावात्मक आहे. या तांत्रिक पेचामुळे १० वर्षे पूर्ण केलेल्या संचालकांना कोणत्या नियमाने अपात्र ठरवायचे, याबाबत सहकार विभागाने 'आरबीआय'कडून मार्गदर्शन मागविले आहे. मात्र, अद्याप कोणताही दिलासा न मिळाल्याने प्रस्थापित नेत्यांवर अपात्रतेची टांगती तलवार कायम आहे.**

# मजुरीसाठी जाणाऱ्या महिलेचा विनयभंग; तोंडाला चावा घेत महिलेने केली सुटका

**केज । प्रतिनिधी**

गेल्या दोन वर्षापासून नवरा बेपत्ता असल्याचा गैरफायदा घेतऊस बांधणीसाठी शेतात मजुरीसाठी जात असलेल्या विवाहित महिलेचा रस्त्यात अडवून वाईट हेतूने विनयभंग करण्याचा एकाने प्रयत्न केला मात्र पीडित महिलेने धाडसी प्रतिकार करत आरोपीच्या तोंडाला चावा घेतला, त्यामुळे आरोपीने पळ काढला.

▶▶ उर्वरित पान २ वर

# अंबाजोगाई: चोरी प्रकरणात दोघांना अटक



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील रविवार पेठ तसेच बाराभाई गल्ली परिसरात झालेल्या घरफोडीचा पोलिसांनी कसून तपास केला.या प्रकरणातील दोन आरोपींना पोलिसांनी शनिवारी अटक केली.त्यांच्याकडून ६ लाख १० हजार रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की काझी मोहम्मद अलीमुद्दीन करीमुद्दीन रा. बाराभाई गल्ली अंबाजेगाई यांच्या बंद घरात २९ जानेवारी रोजी मध्यरात्री सव्वा एकच्या सुमारास दोन चोरट्यांनी प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी चार लाखाची रोख रक्कम व सोन्या चांदीचे

▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यातील शासकीय रुग्णालयांतील मोफत उपचार बंद

**मुंबई । प्रतिनिधी**

शासकीय रुग्णालयांमधून केले जाणारे मोफत उपचार पूर्णपणे बंद करण्यात आले असून यापुढे रुग्णालयातून पुन्हा शुल्क आकारले जाणार आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे इथून पुढे केस पेपर पासून प्रत्येक चाचणीसाठी पैसा मोजावा लागणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून जिल्हा व महिला रुग्णालयांपर्यंत नवे दर लागू होणार असून, बाह्यरुग्ण विभागातील केसपेपरसाठी ५ रुपयांपासून ते सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी ४० हजार रुपयांपर्यंत शुल्क आकारले जाणार आहे.तत्कालीन आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी राज्यातील सर्वच आरोग्य विभागाच्या रुग्णालयात धाडसी निर्णय घेत, मोफत उपचार सुरू केले होते.

▶▶ उर्वरित पान २ वर



### ● नवीन दर खालील प्रमाणे आहेत

**रुग्णालयात दाखल रुग्णांना दररोज १० रुपये प्रवेश शुल्क द्यावे लागेल. एमआरआय स्कॅनसाठी १ हजार ६०० रुपये मोजावे लागतील.हिमोग्लोबिन, टीएलसी, डीएलसी, रक्तगट व आरएच तपासणी, लघवीच्या रासायनिक चाचण्या,कल्चर-सेंसिटिव्हिटी अशा प्रत्येक रक्ततपासणीसाठी १५ रुपये आकारले जातील. मूत्रपिंड व मूत्राशय तपासणीसाठीची इंट्राव्हेनस पायलोग्राम एक्स-रे प्रतिस्कॅन १०० रुपये, डोक्याचा सीटी स्कॅन ३०० रुपये, तर मणका, मान व छातीचा सीटी स्कॅन ४०० रुपये असेल. भूल देऊन करण्यात येणाऱ्या लहान-मोठ्या शस्त्रक्रियांकरिता ६० ते १६० रुपये आकारले जातील.**



# कर्तृत्वाचे शिवधनुष्य, डॉ.ज्योतिताई मेटे यांचा संघर्षमयी प्रवास

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर 'लोकनेते' ही पदवी सार्थ ठरवणारे नेतृत्व म्हणजे स्व.विनायकराव मेटे साहेब. मेटे साहेबांच्या अचानक जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला, पण त्यांच्या पश्चात त्यांच्या विचारांची मशाल विझू न देता, ज्योतिताईंनी जे 'शिवधनुष्य' पेलले आहे, ते पाहून त्यांच्या कर्तृत्वाबद्दलचा आदर द्विगुणित होतो.अरबी समुद्रातील शिवस्मारक असो किंवा मराठा आरक्षणाचा प्रदीर्घ लढा, मेटे साहेबांनी नेहमीच 'दोन हात' करण्याची भूमिका घेतली.✻ ✻ज्योतिताईंनी केवळ साहेबांची पत्नी म्हणून नव्हे, तर त्यांच्या विचारांची वारसदार म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे. साहेबांनी उभा केलेला 'शिवसंग्राम' आणि त्या विचारांशी बांधील असलेला कार्यकर्ता आजही ज्योतिताईंच्या रूपाने साहेबांना शोधत आहे.मेटे साहेबांच्या जाण्याने कुटुंबावर कोसळलेला डोंगर हा शब्दांत न मांडता येणारा होता. मात्र, ज्योतिताईंनी आपल्या वैयक्तिक दुःखाला बाजूला सारून मातृत्व आणि कर्तव्य यांची सुरेख सांगड घातली. मुलांचे छत्र हरपलेले असताना त्यांना आधार देणे आणि दुसरीकडे साहेबांच्या 'शिवसंग्राम' परिवाराला पोरके होऊ न देणे, अशा दोन्ही आघाड्यांवर त्या एकाकी झुंज देत आहेत.या प्रवासात ज्योतिताईंची होणारी 'दमछाक' ही केवळ शारीरिक थकव्याची नाही ती आहे मानसिक संघर्षाची, जिथे



साहेबांच्या अनुपस्थितीत प्रत्येक महत्त्वाचा निर्णय घेताना त्यांना स्वतःच्या मनाशी लढावे लागते आहे. साहेबांनी पाहिलेली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी त्यांना रात्रंदिवस एक करावा लागतो आहे.घराचा उंबरठा आणि समाजाची धुरा या दोन्ही आघाड्यांवर लढताना स्वतःच्या अस्तित्वाचा त्याग करून त्या ध्येयासाठी झटत आहेत. लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेबांच्या जाण्याने केवळ एका कुटुंबाची नव्हे,तर अवघ्या मराठा समाजाची अपार हाणी झाली आहे. साहेबांच्या पश्चात डॉ.ज्योतीताई मेटे यांनी शासकीय सेवेचा त्याग करून खंबीरपणे नेतृत्व स्वीकारले, तेव्हा खऱ्या अर्थाने त्यांचे 'राजकीय पुनर्वसन' होणे अपेक्षित होते.मात्र राजकारणाच्या या क्रूर पटावर एका जिद्दी नेतृत्वाकडे सर्वच पक्षांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, ही खेदाची बाब आहे. राजकारणात वारसा जपण्याची परंपरा नवी नाही. राजीवजी सातव असतील किंवा इतर दिग्गज नेते, त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबीयांना राजकीय आधार देऊन सावरून घेण्याचे 'सौजन्य' सर्वच पक्षांनी दाखवले. पण दुर्दैवाने मेटे साहेबांच्या बाबतीत हा न्याय बदलला.इतर नेत्यांच्या वारसांना ताकद दिली जाते, मग ताईंच्याच वाट्याला ही उपेक्षा का आणि कशामुळे ? मराठा आरक्षणासाठी मेटे साहेबांनी आयुष्य वेचले, पण त्यांच्या वारसाला साथ देताना राजकीय पक्षांनी सोयीस्कर मौन बाळगले. एकीकडे साहेबांच्या नावाचा जयघोष करायचा आणि दुसरीकडे त्यांच्या विचारांची धुरा वाहणाऱ्या ज्योतीताईंच्या हाताला बळ देण्याचे टाळायचे, हा दुटप्पीपणा समाजाच्या नजरेतून सुटलेला नाही.डॉ. ज्योतीताई मेटे यांची स्थिती ही केवळ एका व्यक्तीची उपेक्षा नसून,ती संघर्षाचा वारसा चालवणाऱ्या एका निष्ठावान नेतृत्वावर झालेला अन्याय आहे.वेळ आल्यावर या उपेक्षेला उत्तर मिळेलचमेटे साहेबांच्या पश्चात राजकीय पटलावर अनेक स्थित्यंतरे आली, पण ज्योतिताई डगमगल्या नाहीत. चेहऱ्यावर थकवा न दाखवता, खंबीरपणे पाय रोवून उभ्या असलेल्या ज्योतिताईंकडे पाहताना त्यांच्यातील सुप्त ताकद आणि त्यागाची जाणीव होते. त्यांनी केवळ साहेबांचे नाव पुढे नेले नाही, तर त्यांच्या कार्याला एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे.लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी समाजासाठी आपले आयुष्य वेचले. आज त्यांच्या पश्चात ज्योतिताई तोच वसा पुढे नेण्यासाठी अतोनात कष्ट घेत आहेत. अशा वेळी समाज म्हणून आपण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच साहेबांना दिलेली खरी श्रद्धांजली आणि ज्योतिताईं बद्दलची खरी कृतज्ञता ठरेल.ज्योतिताईंचा हा प्रवास केवळ एका महिलेचा संघर्ष नसून, तो एका ध्येयनिष्ठ प्रेरणेचा प्रवास आहे. त्यांनी पेललेले हे शिवधनुष्य उद्याच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल. साहेबांच्या विचारांचा वारसा आणि ज्योतिताईंचे कर्तृत्व यांच्या संगमातून समाजहिताचे कार्य अविरत चालू राहील, यात शंका नाही.

**– अतुल लांगोरे.**

◆ पान १ वरून पुढे...

## जपानच्या सागा...

प्लास्टिकमुक्त जलस्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम असून यासाठी जपानचे सहकार्य मोलाचे ठरेल असा विश्वास पर्यावरण व दुग्धविकास मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

समुद्रातील व नदीतील प्रदूषण रोखणे, प्लास्टिक कचऱ्याविरुद्ध संयुक्त प्रयत्न करणे तसेच शिक्षण, पशुसंवर्धन आणि सौंदर्यप्रसाधन उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढविण्याबाबतही यावेळी महाराष्ट्र आणि जपानच्या शिष्टमंडळात सकारात्मक चर्चा झाली. पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवास्थानी झालेल्या या बैठकीला जपानच्या सागा प्रांताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सागा प्रांताचे गव्हर्नर योशिनोरी यामागुची यांनी केले. त्यांच्यासमवेत प्रादेशिक देवाणघेवाण विभागाचे उपमहासंचालक मसाहिरो ओनो, आंतरराष्ट्रीय धोरण गटाचे उपसंचालक कोजी योशिताके, प्रकल्प प्रमुख कोकी कनामारू आणि जेट्रो सागाचे मुख्य संचालक हिरोशी योनेयामा उपस्थित होते. तर राज्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव देवेंद्र सिंह आदी उपस्थित होते. महाराष्ट्राला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. मात्र, समुद्रातून वाहून येणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. त्याचबरोबर नद्यांमधील प्रदूषण हीदेखील चिंतेची बाब असून, भारतीय संस्कृतीत नद्यांचे पवित्र स्थान लक्षात घेता त्यांच्या स्वच्छतेसाठी राज्य शासन विशेष कार्यक्रम हाती घेणार आहे, असे मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी राज्यपाल यामागुची यांनी जपानकडील तांत्रिक ज्ञान, व्यवस्थापन अनुभव आणि संशोधन क्षमता महाराष्ट्रासोबत सामायिक करण्याची तयारी दर्शवली. आशियाई समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी ज्ञान भागीदारीच्या माध्यमातून संयुक्त उपक्रम राबविण्याबाबत दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिकेवर यावेळी चर्चा झाली. दुग्ध व्यवसाय क्षेत्रावरही बैठकीत चर्चा- बैठकीत शिक्षण क्षेत्रातील सहकार्यालाही विशेष महत्त्व देण्यात आले. पर्यावरणीय शाश्वतता, पशुविज्ञान आणि वैज्ञानिक संशोधनासाठी परदेशी विद्यापीठांना राज्यात संधी उपलब्ध करून देण्याची तयारी पर्यावरण मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केली. सागा प्रांतामधील संस्थांबरोबर संयुक्त संशोधन, विद्यार्थी देवाणघेवाण आणि तांत्रिक सहकार्याच्या शक्यता यावरही यावेळी चर्चा झाली.दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील नवकल्पना तसेच सौंदर्यप्रसाधन उद्योगातील जपानचे प्रगत तंत्रज्ञान महाराष्ट्रासाठी उपयुक्त ठरू शकते, असे शिष्टमंडळाने नमूद केले. या क्षेत्रांत औद्योगिक व शैक्षणिक सहकार्य वाढविण्याची परस्पर तयारीही व्यक्त करण्यात आली. भविष्यात परस्पर दौरे, तांत्रिक कार्यशाळा आणि दीर्घकालीन सहकार्य आराखडा तयार करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. पर्यावरण संरक्षण,

◆ पान १ वरून पुढे...

शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील भारत-जपान सहकार्याला ही बैठक नवे परिमाण देणारी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## अजित पवारांच्या....

विलीनीकरणास अनुकूल नसल्याचे अप्रत्यक्ष संकेत दिले असताना, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतील नेते मात्र अजितदादांना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात, अशीच इच्छा होती, असा ठाम दावा करत आहेत. या पार्श्वभूमीवर भविष्यात नेमके काय घडणार, याबाबत सामान्य जनतेमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.अशातच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतील ज्येष्ठ नेते आणि खासदार सुनील तटकरे यांनी केलेल्या एका विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना नवे वळण मिळाले आहे.तटकरे पुढे म्हणाले की, येत्या १० फेब्रुवारी रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक होणार असून त्या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित असतील. त्या वेळी त्यांच्याशी विलीनीकरणाबाबत निश्चित चर्चा केली जाईल.

याशिवाय सुनेत्रा पवार दिल्ली दौऱ्यावरही जाऊ शकतात. त्या राष्ट्रपती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याचीही शक्यता असून, योग्य वेळी बसून विलीनीकरणावर चर्चा केली जाईल, असे संकेत तटकरे यांनी दिले.

विमान अपघाताबाबत तटकरेंची स्पष्ट भूमिका अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत उपस्थित केल्या जात असलेल्या शंकांवर बोलताना सुनील तटकरे यांनी सखोल चौकशीची मागणी केली. मी सुरुवातीपासूनच या विमान अपघाताची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी राज्य व केंद्र सरकारकडे केली आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडलेला असून, अजितदादांचं जाणं अत्यंत धक्कादायक आहे. त्यामुळे या अपघातामागील सत्य समोर येणं अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. अपघाताबाबत शंका उपस्थित करणाऱ्या व्यक्तींशी तपास यंत्रणांनी संपर्क साधावा, अशी मागणी करत तटकरे म्हणाले की, या शंका व्यक्त करणारे काही नेते मोठ्या पदावर आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनीही त्यांच्याकडील माहिती जाणून घ्यावी. राज्यातील जनतेला या दुर्दैवी घटनेमागील सत्य लवकर समजलेच पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. तटकरे यांच्या या विधानामुळे आता येत्या काळात राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात नेमकी कोणती दिशा घेतली जाणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## मोदी सरकारचा....

निवडणुकीत उभे राहता येणार नाही. या निर्णयामुळे राज्यातील सहकार क्षेत्रातील अनेक प्रस्थापित नेत्यांना सत्तेतून बाहेर जावे लागणार असून, जिल्हा बँकांच्या राजकारणात मोठी उलथापालथ होऊ शकते.केंद्र सरकारने १ ऑगस्ट २०२५ पासून हा कायदा लागू केला असून, त्यात संचालकांचा कार्यकाळ आठवरून १० वर्षे करण्याचा बदल केला असला तरी, १० वर्षांनंतरच्या सक्तीच्या निवृत्तीमुळे खळबळ उडाली आहे. या नवीन नियमावलीमुळे निर्माण झालेली तांत्रिक अडचण आणि संभाव्य

◆ पान १ वरून पुढे...

अपात्रता लक्षात घेता, राज्य सहकार खात्याने आता रिझर्व्ह बँकेशी संपर्क साधला आहे. काही बँकांनी या नियमाला न्यायालयात आव्हान दिले होते, मात्र कलकत्ता उच्च न्यायालयाने या संबंधित याचिका फेटाळून लावली. शिवाय कोल्हापूर खंडपीठाकडूनही कोणताही दिलासा मिळाला नाही. त्यामुळे संचालकांवर अपात्रतेची टांगती तलवार कायम आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर आता सहकारी संस्थांच्या निवडणुका गती घेत असतानाच हा कायदेशीर अडथळा समोर आल्याने सत्ताधाऱ्यांची धाकधूक वाढली आहे. कायद्यातील त्रुटींवर बोट : याबाबत राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी मात्र या कायद्यातली त्रुटींवर बोट ठेवले आहे. बँकिंग कायद्यातील दुरुस्तीमुळे १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे संचालक अपात्र ठरणार आहेत. मात्र त्याच वेळी त्यांच्या कुटुंबातील वारसदार पुन्हा बँकेवर संचालक म्हणून निवडून येऊ शकतात. त्यामुळे सुधारणेचा उद्देश साध्य होणार नाही. या कायद्यात अनेक त्रुटी किंवा अडचणी आहेत. त्याबाबत देखील स्पष्टता येणे गरजेचे आहे, अशी मागणी त्यांनी केली.

## अंबाजोगाई: चोरी....

दागिने असा ११ लाख ७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. ही चोरीची घटना लक्षात आल्यानंतर काजी मोहम्मद यांनी अंबाजोगाई पोलिसांत धाव घेत गुन्हा दाखल केला. त्यानुसार पोलिसांनी तपासाची चक्रं फिरवित पठाण मोहम्मद रियाज खान वय २५ वर्ष, रा. बाराभाई गल्ली व सलमान मुस्तफा शेख वय ३१ वर्ष, रा. झारेगल्ली, अंबाजोगाई या दोघांना शिताफिने पकडले त्यांच्याकडून ६ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे

## मजुरीसाठी जाणाऱ्या...

६ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे ८.१५ वाजताच्या सुमारास घडली. केज तालुक्यातील ही महिला रोजंदारीने ऊस बांधणीचे काम करण्यासाठी एकटीच पायी शेताकडे जात असताना आरोपीने तिला रस्त्यात अडवले. त्यानंतर झटापट करत वाईट हेतूने तिच्याशी गैरवर्तन करून तिचा विनयभंग केला. आरोपीच्या तावडीतून सुटण्यासाठी महिलेने त्याच्या तोंडाला जोरदार चावा घेतला. त्यामुळे जखमी झालेल्या आरोपीने तिला सोडून घटना स्थळावरून पळ काढला. या घटनेनंतर पीडित महिलेने तात्काळ आपल्या दीर, जाऊ व सासू यांना संपूर्ण प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर कुटुंबीयांसह केज पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल करण्यात आली. या तक्रारीवरून अजहर अशरफ पठाण याच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर ५७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ७४, ११५(२) तसेच ट्रॉसिटी कायद्यानुसार कलम ३(१)(आर), ३(१)(डब्ल्यू)(ळ) व ३(१)(डब्ल्यू)(ळळ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम हे करीत

◆ पान १ वरून पुढे...

आहेत. दरम्यान पीडित महिलेने प्रसंगावधान राखत केलेल्या प्रतिकारात आरोपीच्या तोंडाला जोरदार चावा घेतल्याने तो जखमी झाला आहे. या घटनेनंतर आरोपीची परिसरात चांगलीच चर्चा होत असून त्याच्या कृत्याचा सर्वत्र निषेध व्यक्त केला जात आहे. पीडित महिलेचा पती गेल्या दोन वर्षापासून बेपत्ता असून या प्रकरणात पोलीस दप्तरी नोंद देखील करण्यात आलेली आहे. पीडित महिलेच्या याच परिस्थितीचा फायदा घेण्याचा आरोपीने प्रयत्न केला असल्याचं प्राथमिक तपासात उघडकीस आला आहे

## राज्यातील शासकीय...

त्याची अंमलबजावणी १५ ऑगस्ट २०२३ मध्ये सुरू झाली. तेव्हापासून आतापर्यंत सर्वच ठिकाणी मोफत उपचार केले जात आहेत. यामध्ये केसपेपर काढण्यापासून रक्ततपासणी, इतर सर्व तपासण्या आणि सर्व उपचार मोफत आहेत. परंतु, गेल्या काही दिवसांत ही संकल्पना व्यवहार्य ठरत नसल्याचा साक्षात्कार आरोग्य विभागाला झाला असून, अलीकडेच जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, आता उपचारासाठी दर लागू केले आहेत. याबाबत आरोग्य हक्क कार्यकर्ते शरद शेट्टी म्हणाले, शासन निर्णयातील शुल्क कागदावर कमी वाटत असले, तरी शासकीय रुग्णालयांत येणारे बहुतांश रुग्ण समाजातील अत्यंत दुर्बल घटकांतील असतात. त्यासाठी मोफत उपचार असावेत. खासदार, आमदार आदींसाठी मोफत उपचारांचा उल्लेख आहे, जे प्रत्यक्षात शासकीय रुग्णालयांत उपचार घेतच नाहीत. सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करावा.

पहिली प्रसूती मोफत- पहिली प्रसूती मोफत असून, दुसऱ्यासाठी ५० रुपये, तर तिसरी व पुढील प्रत्येक प्रसूतीसाठी २५० रुपये शुल्क आकारले जाईल. वातानुकूलित खोलीसाठी दररोज १५० रुपये आणि साधारण खोलीसाठी ७५ रुपये, आयसीयूसाठी १०० रुपये, तसेच प्रत्येक डायलिसिससाठी १५० रुपये आकारले जातील. मृतदेह एम्बाल्मिंगसाठी १५०० रुपये शुल्क राहील. रुग्णवाहिकेसाठी प्रति किमी ५ रुपये व ८ तासांनंतर प्रति तास ३० रुपये प्रतीक्षा शुल्क आकारले जाईल, तर सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया ४० हजार रुपयांत करण्यात येईल.

इतर योजनांचा लाभ कायम- सरकारने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशांनुसार, काही घटकांना मोफत उपचारांचा लाभ कायम राहणार आहे. यात शासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय, शासकीय रुग्णालयांतील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, क्युपेशनल व फिजिओथेरपीचे विद्यार्थी, न्यायालयीन कोठडीत असलेले व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे कुटुंबीय, वैद्यकीय-न्यायवैद्यकीय प्रकरणांतील रुग्ण, न्यायालयीन चौकशीतील कैदी, पोलिसांकडून पाठविलेली प्रकरणे, कुष्ठरोग मंडळामार्फत पाठवलेले रुग्ण, आश्रमशाळा व महिला सुधारगृहांमार्फत पाठवलेले रुग्ण, शहरी भागातील निराधार मुले, आमदार, खासदार, मंत्री, न्यायाधीश यांचा समावेश आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## राजुरी परिसरातील...

राजूरी परिसरातील ८ ते १० गावांना शेती सिंचनासाठी पूरक ठरू शकणारा स्रोत आहे. परंतु सदरील तलावाचे काम मोठ्या कालवधीपूर्वी झाल्यामुळे याठिकाणी मुख्य बांधकाम कमकुवत होणे, त्यातून पाण्याची गळती होणे, सांडव्याची दुभाजक भिंत मोडकळीस आली होती. त्यामुळे येथे आवश्यक ती दुरूस्तीची कामे होणे अत्यंत गरजेचे होते. ही बाब लक्षात घेऊन राजूरी परिसरातील शेतकरी बांधवांनी आदर्श गाव वंजारवाडीचे सरपंच वैजनाथ तांदळे यांच्या माध्यमातून हा प्रश्न आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे मांडला. त्यावर आ.क्षीरसागर यांनी या संदर्भात शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. परिणामी वंजारवाडी तलाव आणि पाटदुरूस्तीच्या कामासाठी १ कोटी ७ लाख रूपयांचा भरघोस निधीसह मंजूरी मिळाली आहे.आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. त्यामुळे राजूरी, वंजारवाडी आणि परिसरातील गावांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

## पशुवैद्यकीय अधिकारी....

अधिकारी गावात जात नसल्याने शेतकरी असुरक्षिततेत राहत आहेत. अनेक गावांतील जनावरांना रोगाच्या प्राथमिक लक्षणांची चाहूल लागत असतानाही अधिकारी कोणतीही तपासणी करीत नाहीत. ग्रामीण भागात पशु वैद्यकीय सेवा अपेक्षित तऱ्हेने दिली जात नसल्याने पशुपालकांमध्ये तिव्र रोष निर्माण झाला आहे.ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, लसीकरणासाठी आम्ही अनेकदा दवाखान्यात चौकशी करतो, पण अधिकारी वेळ ठरवत नाहीत. काही वेळा त्यांना गावात बोलावल्यानंतरही ते येत नाहीत. जनावरं आजारी पडली तर नुकसान आमचंच होणार पण खात्याचे कर्मचारी मात्र उंटावरून शेळ्या हकताना दिसतात.यामुळे रोग नियंत्रणाबाबत अनिश्चितता वाढली असून शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागण्याची भीती आहे. स्थानिक ग्रामीण भागातून याबाबत वारंवार सांगितले असूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी नाही,असा आरोप सतत केला जात आहे. शेतकऱ्यांची ठाम मागणी आहे की, पशुवैद्यकीय अधिकारी प्रत्यक्ष क्षेत्रात उतरावेत, लसीकरण मोहीम तातडीने राबवावी आणि आमची जनावरं रोगमुक्त ठेवण्यासाठी जबाबदारीने काम करावं. अन्यथा खात्याच्या निष्क्रियतेमुळे होणाऱ्या नुकसानीला संबंधित अधिकाऱ्यांनाच जबाबदार धरण्यात येईल असा इशारा ग्रामस्थ व पशुपालकांनी दिला आहे.

## अनिल जगतापांच्या...

◆ पान ४ वरून पुढे...

यशस्वीपणे सुरू आहे. या माध्यमातून नव्या पिढीतील कलाकार घडत असून याचे मला प्रचंड समाधान आहे. कलाकारांच्या बालेकिल्ल्याची परंपरा व सांस्कृतिक वारसा पुढे नेत २ फेब्रुवारीपासून सुरू असलेला चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक भव्य-दिव्य स्वरूपात पार पडत असून रसिकांकडून उदंड प्रतिसाद मिळत आहे. या महोत्सवाची दखल घेत मा. अशोकजी पटवर्धन साहेब यांनी चंपावतीच्या रंगमंचावर उपस्थिती लावून महोत्सवाचा गौरव वाढवला. दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी, अनिल दादा जगताप फाउंडेशन व शिवसेना बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गीत गायन स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मा. अशोकजी पटवर्धन साहेब यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला. यावेळी बीड जिल्ह्याचे संगीत रत्न भरत अण्णा लोळगे, सुदर्शन धूतेकर, कलावंत-पत्रकार महेश वाघमारे, दै. दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोषजी मानूरकर, दै. पार्श्वभूमीचे प्रा. लक्ष्मीकांतजी बाहेगाव्हाणकर, दै. सकाळचे दत्ताजी देशमुख, अनिताताई भोसले, मराठी महाराष्ट्र चॅनलचे संपादक संग्रामजी धनवे, कलावंत किशोरजी धुताडमाल, पूनमताई धुताडमाल, परीक्षक सौ. धुतेकर मॅडम, परीक्षक मजहरजी शेख सर, शिवसेना बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले, तालुका प्रमुख संतोष जाधव, आकाश जगताप तसेच प्रतिक कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व उपस्थित सन्माननीय मान्यवरांनी चंपावती महोत्सव अविरत सुरू राहावा अशी भावना व्यक्त करत आयोजक व सहभागी कलाकारांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## पोलीस निरीक्षक...

माजलगाव शहरात रुजू झाल्याने माजलगाव पत्रकारांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी बीड लोकरंजन चे संपादक परमेश्वर सोळंके, बाळासाहेब आडागळे, संतोष रासवे, पृथ्वीराज निर्मळ, बालासाहेब उफाडे, फेरोज पठाण, नाजर कुरेशी, महादू बप्पा ताकट, भास्कर जाधव (सरपंच) महादेव नाना आढाव आदींच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## राजा हरिश्चंद्र...

आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांच्या आधिपत्याखाली या तीर्थ स्थळाचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही परंपरा चालू आहे. यावर्षी या ठिकाणी महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन केले असून जय्यत तयारी करण्यात आली आहे. राज्यातील नामवंत कीर्तनकार या महोत्सवात आपली हजेरी लावून कीर्तने करणार आहेत. सोमवार दि.

◆ पान ४ वरून पुढे...

०९ फेब्रुवारी रोजी महोत्सवाची सुरुवात होत असून १६ रोजी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. ०९ रोजी रात्री श्री.हभप. भगीरथ महाराज काळे (सिन्नर), १० रोजी श्री हभप. जयेश महाराज भाग्यवंत (मुंबई), ११ रोजी श्री.ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे (परळी वें.), १२ रोजी श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगांव), १३ रोजी श्री.ह.भ.प. कोमलसिंग महाराज (धुळे), १४ रोजी श्री.ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) १५ रोजी महाशिवरात्रीला श्रीक्षेत्र भगवानगडाचे उत्तर अधिकारी श्री.ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री (श्रीक्षेत्र भगवान गड) यांची कीर्तन सेवा होणार असून दिनांक १६ रोजी सकाळी ११:०० ते १:०० या वेळेत महंत भगवान बाबा राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे. यावेळी आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन महंत भगवान बाबा राजपूत यांच्यासह परिसरातील राजा हरिश्चंद्र पिंपरी पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी केली आहे. तरुणांची फौज- हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी राजा हरिश्चंद्र पिंपरी आणि पंचक्रोशीतील शेकडो तरुण या ठिकाणी आपली कामे सोडून वाढ करण्यासाठी, स्वच्छता करण्यासाठी, तसेच आलेल्या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी या ठिकाणी मेहनत घेत असतात. या तरुणांच्या फौजेमुळे या ठिकाणी आलेल्या सर्व भाविकांचे संरक्षणही होत असते.

भरत पठाडे, रवी पवार, रामानंद ढाले, झुका गुरुजी यांची जुगलबंदी - राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर सर्वांचं आकर्षण असतं ते मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे, गायनाचार्य रवी महाराज पवार आणि गायनाचार्य रामानंद महाराज ढाले यांच्यावर. ख्यातनाम मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे यांचा मृदंग कडाडताना भाविकांना पाहायला मिळतो या मृदंगावर रवी महाराज पवार, रामानंद महाराज ढाले गुरुजी यांची जुगलबंदी पाहताना भाविकांच्या अंगावर काटा उभा राहतो. कीर्तनकारांपेक्षाही ही मंडळी भाविकांचं मन तल्लीन करून टाकतात. त्याचबरोबर १४.०२.२०२६ रोजी संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. देविदास महाराज जाधव उर्फ झुकागुरुजी यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यात प्रकाश महाराज कातकडे, श्री. इंद्रभान महाराज गुरूजी, श्री. विठ्ठल म.महागोविंद, श्री. बाजीराव म. काळे, हरिदास म. पांचाळ, श्री. दत्ता म. सातले, श्री जगन महाराज, पांडुरंग म. काळे, श्री. माऊली म. खोटे, श्री. सचिन म.मुंडे, व पंचक्रोशीतील गायक, वादक सातही दिवस उपस्थित राहणार आहेत. महंत हनुमंत महाराज शास्त्री यांचे दररोज ज्ञानेश्वरी प्रवचन- साल सिद्ध बाबा संस्थानचे महंत ह भ प हनुमंत महाराज शास्त्री यांची दरवर्षी महाशिवरात्र महोत्सवात

◆ पान ४ वरून पुढे...

आठ दिवस उपस्थिती असते या महोत्सवांमध्ये दररोज दुपारी चार ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत ग्रंथराज ज्ञानेश्वरी वर प्रवचन सेवा असते या प्रवचन सेवेला मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. यावर्षी देखील हनुमंत महाराज यांच्या प्रवचन सेवेचा लाभ भाविकांना मिळणार आहे. यांची होणार हरि कीर्तनसेवा- श्री.ह.भ.प. भगीरथ महाराज काळे (सिन्नर), श्री.ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंत (मुंबई), श्री.ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे (परळी वें.), श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगांव), श्री.ह.भ.प. कोमलसिंग महाराज (धुळे), श्री.ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर), श्री.ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री (उत्तराधीकारी श्रीक्षेत्र भगवान गड), महंत भगवान महाराज राजपूत यांचे काल्याचे कीर्तन

## लिंबागणेश ग्रामपंचायत...

जीवनकार्यावर प्रेरणादायी विचार मांडले. त्यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ माता रमाईंना अर्पण केला होता. बाबासाहेबांनी रमाईंच्या त्यागाबद्दल लिहिताना म्हटले होते - रमा, तू नसतीस तर मी भीमाचा भिमराव आणि भिमरावाचा बाबासाहेब होऊ शकलो नसतो. डॉ. ढवळे यांनी माता रमाई यांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा घेत सांगितले की, लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरपलेली रमाई, सासरीही अनेक आप्तस्वकीयांच्या मृत्यूचे दुःख सहन करत आयुष्यभर धैर्याने उभी राहिली. सासरे सुभेदार रामजी, बाबासाहेबांचे बंधू, पुतण्या, सावत्र आई तसेच स्वतःच्या मुलांच्या निधनाचे दुःख त्यांनी शांतपणे सहन केले. रमेश, गंगाधर, राजरत्न आणि इंदू या मुलांच्या वियोगाचे वेदनादायी क्षण त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले, मात्र बाबासाहेबांच्या शिक्षणकार्याला व समाजोद्धाराच्या ध्येयाला त्यांनी कधीही बाधा येऊ दिली नाही. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याला अखंड साथ दिली. माता रमाई यांचे योगदान केवळ कौटुंबिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अमूल्य आहे, असे प्रतिपादन डॉ. ढवळे यांनी केले. वयाच्या अवघ्या ३७ व्या वर्षी त्यांचे निधन झाले, मात्र त्यांच्या त्यागामुळे त्या आजही दिनदलितांची माता रमाई म्हणून स्मरणात आहेत. कार्यक्रमात रविंद्र निर्मळ आणि पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनीही समायोजित भाषणे केली.यावेळी माजी उपसरपंच शंकर वाणी, दादा गायकवाड, बाळकृष्ण थोरात, शिवाजी जाधव, गणपत तागड, जितेंद्र निर्मळ, सर्पमित्र अशोक जाधव, राहुल निर्मळ, सिताराम थोरात, संजय पावले, जीवन मुळे, सुखदेव वाणी, प्रमोद निर्मळ, जगन्नाथ मोरे, शाकींदर काटकर, कल्याण मांडवे आदी मान्यवर उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे प्रशिक्षण
# आरोग्यपुरक उत्पादनांवर भर द्या: जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

महिला बचत गटांनी आपली खाद्यपदार्थांचे वा कृषी उत्पन्न आधारीत उत्पादने तयार करतांना आरोग्यपुरक उत्पादनांवर भर द्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले. महिला आर्थिक विकास महामंडळाव्दारे समुह साधन व्यक्तिंकरीता दोन दिवसीय हवामान बदल अनुकूलन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्धाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. माविमचे जिल्हा समन्वयक चंदनसिंग राठोड, माविमचे विभागीय सल्लागार संदीप मराठे, उत्कर्ष भोळे, सुनिल पैठणे, फारह हुसेनी आदी उपस्थित होते. समतामूलक परिवर्तन यंत्रणा उभारण्याच्या उपक्रमाचा भाग म्हणून या हवामान बदल अनुकूलन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षण कार्यक्रमात ५२ प्रशिक्षणार्थी महिलांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. हवामान बदलांचा परिणाम ध्यानात घेऊन तयार करावयाची उत्पादने याबाबत हे प्रशिक्षण देण्यात येत आहे. खाद्यपदार्थी निर्मितीमध्ये उत्पादन ते विक्री अशी सक्षम साखळी निर्माण करण्यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, बचत गटाद्वारे उत्पादीत उत्पादनांना बाजारात चांगली मागणी असते. ही उत्पादने आरोग्यपूरक असावीत. पोषणमूल्य म्हणून बाजारात विक्री होणारी पेये, पदार्थ इत्यादींच्या उत्पादनात महिला बचत गटांनी योगदान द्यावे. त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी बाजारात साखळी निर्माण करता येईल,असेही त्यांनी सांगितले. या उत्पादनांची विक्री, त्यासाठी करावे लागणारे ब्रँडींग, त्याचे लेखे तयार करणे इ.साठीही महिलांना प्रशिक्षण देण्यात यावे .

# त्याग, सहनशीलता व स्त्रीशक्तीचे सर्वोच्च प्रतीक म्हणेज माता रमाई: आयु सरिता खेमाडे

**बीड । प्रतिनिधी**

धम्मदीप बुद्ध विहार, बलभीम नगर, शिवाजीनगर बीड येथे आयोजित त्यागमूर्ती माता रमाई यांच्या १२९ व्या जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून आयु सरिता खेमाडे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आयु हेमा वडमारे, पंचफुला वाघमारे, रमाबाई सोनवणे, सुजाता वाघमारे, अशा धनवे,यांची उपस्थिती होती सर्व प्रथम तथागत गौतम बुद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेस अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले त्यानंतर आलेल्या मान्यवरांची महिला मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर अदिती धनवे अंजली विशाल वडमारे अंजली तेजस वडमारे सुजाता वाघमारे आशा धनवे यांनी त्यागमूर्ती माता रमाई



यांच्या जीवन चरित्रावर आपले मोलाचे मार्गदर्शन केले त्यानंतर अध्यक्षीय समारोपात आयुष्यमती सरिता खेमाडे यांनी आपले मत व्यक्त करताना म्हणाल्या त्यागमूर्ती माता रमाई या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी असून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यानी घर, कुटुंब आणि समाजसेवेत मोलाची साथ देणारी व्यक्तिमत्त्व आहे. अवघ्या ९ व्या वर्षी विवाह झाल्यापासून ते २७ मे १९३५ रोजी निधन होईपर्यंत, त्यांनी अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत उपासमार सहन करून चार पोटची लेकरं गमावून डॉ.बाबासाहेबांना शिकण्यासाठी व समाजकार्यासाठी प्रोत्साहन दिले. ही त्या समर्पणाची भावना आजच्या स्त्रीने समजून घेणे गरजेचे आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब अमेरिकेत होते तेव्हा रमाबाईंनी खूप कठीण परिस्थितीत हालाखीचे दिवस घालवले. माता रमाई या कठीण काळातही कोणतीही तक्रार न करता मोठ्या संयमाने हसून दिवस काढले. डिसेंबर १९४० मध्ये डॉ. भीमराव आंबेडकर यांनी थॉट्स ऑफ पाकिस्तान हे पुस्तक लिहिले आणि ते केवळ त्यांची पत्नी रामो यांना समर्पित केले. असे मोलाचे मार्गदर्शन केले त्यानंतर शौर्या आर्केस्ट्रा बीड च्या ऑर्गनायझर शकुंतला ससाने मॅडम व ड. चंद्रमुनी वीर, रमेश जावळे यांनी भीम गीतांचा तसेच त्यागमूर्ती माता रमाई यांच्या गीतांचा प्रबोधनातून प्रचार आणि प्रसार करून त्याग मूर्ती माता रमाई डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र विविध गीत सुमधुर आवाजात गाऊन जमलेल्या अनुयायांना मंत्रमुग्ध केले त्यानंतर शेवटी सरनात्तयने कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ड. तेजस वडमारे यांनी केले व भोजनदान करण्यात आले या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक राधाताई साळवे, माया वडमारे, कुसुम साळवे, आशाबाई खेमाडे, आशाबाई भालेराव,आम्रपाली वडमारे, राणी लांडगे, सोनाली सकपाळ, दीपाताई सारणीकर, अर्चना जाधव,प्रीती जाधव, वर्षा खेमाडे, शिवकन्या खेमाडे, उषा जाधव, क्रांती धनवे,शीला साळवे, राणी साळवे, जानवी वाघमारे, कोमल वाघमारे, साखराबाई वाघमारे,काशीबाई गायकवाड, मीरा खेमाडे, सुधा सोनवणे, शितल साबळे,सोनाली अंकुटे, छाया जोगदंड, आचल वडमारी,स्वाती वडमारे, जयश्री वडमारे, सुवर्णा वाघमारे, जयश्री गवळी, नंदिनी वडमारे, किरण वडमारे, निवृत्ती वाघमारे, विशाल वडमारे, दिलीप गवळी, बन्सी वाघमारे, सिद्धार्थ वडमारे, आर्यन साळवे, जय जाधव, राज जाधव, ज्ञानेश्वर इंगळे, नागेश साळवे, नितीन वाघमारे, सचिन वाघमारे, गौतम खेमाडे,राजू धनवे, संजय धनवे, करण वडमारे, प्रेम जोगदंड, सेनापती वडमारे व परिसरातील सर्व बांधव उपस्थित होते.

## तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे व ग्रामविकास अधिकारी मुसळे आम्हा आंदोलकांचा जिव घेण्याच्या मनस्थितित: शेख खिजर, जयदेव शिगणे

## तलवाडा गाव तलाव संरक्षण भीती लगटचे आतिक्रमण संदर्भात संबंधितास दोन नोटीसा निघाल्या पण तीसऱ्या नोटीसला विलंब का ?

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भीती लगटचे आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर



जैनोदीन व जयदेव शिंगणे हे पदाधिकारी गेल्या वर्षभरा पासुन सातत्याने विविध आंदोलन करत असुन संबधित प्रशासनाने आंदोलनाची दखल घेत सकारात्मक प्रतिसाद देत आतिक्रमण धारकांना स्वताहुन आतिक्रमण काढुन घेण्या संदर्भात दोन दोन नोटीसा दिलेल्या आसतांना तीसरी नोटीस देण्यास विलंब का ? आसा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत असून दिनांक २६/१/२०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी तलवाडा गाव तलावात जलसमाधी आंदोलन करणाऱ्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना एक महिण्याच्या आत तीसरी नोटीस देऊन आतिक्रमण काढण्यात येईल आसे लेखी आश्वासन दिलेले आसतांना दिलेल्या वेळेचा अर्धा कालावधी ऊलटत आलेला आसतांना देखील काहीच हालचाली दिसुन येत नसल्याने तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे व ग्रामविकास अधिकारी मुसळे हे आम्हा आंदोलकांचा जिव घेण्याच्या मनस्थितित! आसल्याचे गावक-यातुन बोलल्या जाऊ लागल्याने आमची मनस्थिति व मानसिकतेवर आघात करुन आंदोलनाच्या माध्यमातून आमचा जिव घेण्याच्या प्रयत्णात प्रशासक व ग्रामविकास अधिकारी आसल्याचे मत शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी माध्यमांना माहिती देतांना व्यक्त केले आहे.

# महाराणी ताराबाई विद्यालयात दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

## बीड जिल्ह्याचा अभिमान वाढेल असे यश संपादन करा: डॉ.ओमप्रकाशजी शेटे

**वडवणी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या मातीला इतिहास,वारसा आहे गुणवत्तेच्या जोरावर होऊ घातलेल्या इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून बीड जिल्हाचा अभिमान वाढवावा असे मार्गदर्शन महाराणी ताराबाई विद्यालयातील इयत्ता- दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या कार्यक्रम प्रसंगी आयुष्यमान भारत मिशन समितीचे प्रमुख ,देवदूत मा.डॉ. ओमप्रकाशजी शेटे यांनी केले. वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता- १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शुक्रवार दि.०६ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संस्थापक तथा माजी आमदार केशवराव आंधळे तर



प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा.श्री. डॉ.ओमप्रकाशजी शेटे अध्यक्ष- आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती तसेच प्रमुख पाहुणे म्हणून स.पो.नि. वर्षा व्हगाडे मॅडम, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, पत्रकार बंडूजी खांडेकर,सरपंच भगवानरावजी कांदे, उद्योजक नागेश कानडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकररावजी धस सर,श्री.फासे सर,डॉ.हांगे साहेब,वडवणी शहराध्यक्ष भाजपा श्रीमंतजी मुंडे,संस्थेचे माजी अध्यक्ष राजेभाऊ वारे,पत्रकार डोईफोडे सर,संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे,प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे, उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,श्री.दिनेशजी घोळवे सर अदी मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आरती खेत्रे, हर्षदा कदम यांनी स्वागत गीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. विद्यार्थी प्रतिनिधी स्वरूपात प्रतिक्षा तंबूड,अंजली चव्हाण, सोनाली नाईकवाडे यांनी आपल्या शाळेतील आठवणी सांगितल्या तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्या एपीआय श्रीम.वर्षा व्हगाडे, उपप्राचार्य मस्के सर,श्रीमंत मुंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. श्री.मधुकररावजी धस गुरुजी व त्यांच्या सौभाग्यवती जिजाबाई धस हे धस दांपत्ये कतार देशाचा परदेश दौरा करून आल्याबद्दल कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार केशवराव आंधळे यांनी शाल,बुके देऊन सत्कार केला. त्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा.आ केशवराव आंधळे म्हणाले की,जिद्द ,मेहनत ,चिकाटीने अडचणीवर मात करून यश संपादन करता येते तुम्ही खूप अभ्यास करा बोर्ड परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन करून स्वतःच शाळेचे नाव रोशन करा असे बोलून इ. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# महाशिवरात्री निमित्त बहिरवाडीतील सिध्देश्वर नगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## ह.भ.प.शंकर महाराज चिंचकर यांच्या सुमधूर वाणीतून शिवमहापुराण कथेने होणार प्रारंभ ; अखंड हरिनाम सप्ताहामध्ये नामवंत कीर्तनकारांची सेवा

**बीड । प्रतिनिधी**

शहरापासून जवळच असलेल्या बहिरवाडी येथील सिध्देश्वर नगर येथे महाशिवरात्री निमित्त श्रीक्षेत्र रामगड संस्थाचे महंत ह.भ.प.गुरुवर्य स्वामी योगीराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दि.११ ते दि.१८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीमध्ये अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराणकथेचे आयोजन करण्यात आले असून या धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमांचा बहिरवाडी पंचक्रोषिसह बीड शहरातील नागरीकांनी आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाचे यंदाचे २४ वे वर्ष असून या सप्ताहामध्ये अनेक नामवंत कीर्तनकार आपली



सेवा देत असतात. यंदाच्यावर्षी ह.भ.प.शंकर महाराज चिंचकर यांच्या सुमधूर वाणीतून शिवमहापुराणकथा दि.११ फेब्रुवारी पासून दुपारी १ ते ४ या वेळेत होणार आहे. कलश पूजन, विना पूजन, श्री शिवमहापुराण ग्रंथ पूजन, गाथा पूजनाने या अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात होणार आहे. पहाटे ५ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णु सहस्त्रनाम, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते १२ गाथा भजन, दुपारी १ ते ४ शिवमहापुराणकथा, सायं.५ ते ६ हरिपाठ, रात्री ८.३० ते १०.३० हरीकीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम सप्ताह दरम्यान संपन्न होणार आहेत. बुधवार दि.११ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वा. भागवताचार्य ह.भ.प.अंकिताताई घुले महाराज यांचे किर्तन, दि.१२ रोजी श्रीक्षेत्र दत्त संस्थान लोळदगावचे महंत ह.भ.प.वसंत महाराज लोळदगावकर यांचे किर्तन होणार आहे. तर शुक्रवार दि.१३ रोजी ह.भ.प.राजेंद्र महाराज सावंत, शनिवार दि.१४ रोजी गेवराई तालुक्यातील ह.भ.प.लक्ष्मीताई महाराज काळे, रविवार दि.१५ रोजी ह.भ.प.भिमराव महाराज यादव, सोमवार दि.१६ रोजी श्रीक्षेत्र जंगमबाबा दत्त संस्थान तांबा राजुरी येथील ह.भ.प.स्वामी शिवानंद भारती महाराज यांची कीर्तन सेवा, मंगळवार दि.१७ रोजी सद्गुरु बंकटस्वामी संस्थान नेकनूर येथील ह.भ.प.रामायणाचार्य नाना महाराज कदम यांची कीर्तन सेवा होणार आहे. विष्णु सहस्त्र नाम व ज्ञानेश्वरी पारायणाचे नेतृत्व ह.भ.प.शिवाजी महाराज भोसले हे करणार आहेत. तर बुधवार दि.१८ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत श्रीक्षेत्र रामगड संस्थानचे महंत ह.भ.प.गुरुवर्य स्वामी योगीराज महाराज यांचे काल्याचे कीर्तन संपन्न होणार असून त्या नंतर भाविक-भक्तांना महाप्रसाद दिला जाणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा बहिरवाडी पंचक्रोषीतील व बीड शहरातील नागरीकांनी आवश्य लाभ घ्यावा



*माता रमाई बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ग्रामीण रुग्णालय मातोश्री कॅम्पस, काठोडा साजरी- आज दि.०७.०२.२०२६ रोजी मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव काठोडा (ग्रामीण रुग्णालय मातोश्री कॅम्पस) ता.जि.बीड येथे स्वर्गीय माता रमाई बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष सौ छाया दिलीप पवार यांनी माता रमाई यांच्या कार्याबद्दल,त्याग, व प्रेरणा बद्दल मार्गदर्शन केले. यावेळ उपस्थित संस्थेचे अध्यक्ष सौ छाया दिलीप पवार,तेजस पवार, तेजस्विनी पवार, ग्रामीण रुग्णालय चे डॉ.स्नेहल पवार,मयुरी जाधव, होते.*

**जाहिर प्रगटन**

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ३००/२०२५**
**आशाबाई व ईतर विरुध्द निल.**

अर्जदार :- **१) आशाबाई भ्र. आसाराम उगले वय ६५ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. हाजीपुर, ता. शिरुर कासार, जि. बीड. २) अजित पि. आसाराम उगले, वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ३) विशाल पि. आसाराम उगले वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. सदर मो. नं. ९१४६२३६३८३. ४) साधना पि. आसाराम उगले वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर.**

विरुध्द निल.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्यापेक्षा **मयत नामे आसाराम पि. राणुजी उगले रा. हाजीपुर, ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन दि. २२/०१/२०११ रोजी मौजे हाजीपुर, ता. शिरुर का., जि. बीड,** येथे अर्जदारांचे राहते घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि आहे तसेच अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र. ४ हि मयताची मुलगी आहे. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात .. हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १६/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **पुढील तारीख - २८/११/२०२५**
**(ॲड. एच. एस. कोठुळे यांच्यामार्फत )**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर शिरूर का.**
शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

**जाहिर प्रगटन**

**श्रीमती. मनिषा एस. पठारे, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १३३९ / २०२५**

अर्जदार :- **१. पद्मीबाई बळीराम सवासे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोनगिरवाडी, पो. बोरफडी, ता. जि. बीड, २.आसाराम बळीराम सवासे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. कानोपात्रा बळीराम सवासे, वय ३४ वर्षे, घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ४. पुष्पा आसाराम पन्हाळे, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ५. हौसाबाई बबन बोंगाने, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. गंगानाथवाडी, ता. जि. बीड, ६. कांताबाई भिमराव पवार, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. सत्यवाडी, ता. वडवणी, जि.बीड,**

विरुध्द 'निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी **मयत नामे बळीराम नारायण सवासे या दि. १२/१२/२०२४ रोजी नेकनुर, ता. जि. बीड** येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी आहे. तसेच अर्जदार क २ हा मुलगा आहे तर अर्जदार क ३ ते ६ या मयताच्या मुली आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २६/०८/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली..
**पुढील तारीख:- ०७/०२/२०२६**
**( मार्फत विधिज्ञ:- श्री जी एस घुगे )**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर बीड**
शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

**जाहिर प्रगटन**

**श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ३००/२०२५**
**आशाबाई व ईतर विरुध्द निल.**

अर्जदार :- **१) आशाबाई भ्र. आसाराम उगले वय ६५ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. हाजीपुर, ता. शिरुर कासार, जि. बीड, २) अजित पि. आसाराम उगले, वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ३) विशाल पि. आसाराम उगले वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. सदर. मो. नं. ९१४६२३६३८३. ४) साधना पि. आसाराम उगले वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर.**

विरुध्द निल.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्यापेक्षा मयत नामे आसाराम पि. राणुजी उगले रा. हाजीपुर, ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. २२/०१/२०११ रोजी मौजे हाजीपुर, ता. शिरुर का., जि. बीड येथे अर्जदारांचे राहते घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि आहे तसेच अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र. ४ हि मयताची मुलगी आहे. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबी दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १६/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **पुढील तारीख - २८/११/२०२५**
**(ॲड. एच. एस. कोठुळे यांच्यामार्फत )**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर शिरूर का.**
शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. ०८ फेब्रुवारी २०२६ ●

## थोडक्यात...

### धुनकवाड येथे महाशिवरात्रीनिमित्त शिवपुराण कथेचे आयोजन



**वडवणी । प्रतिनिधी**

धुनकवाड नं.२ येथे ग्रामदैवत धुनकेश्वर मंदिरात महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त शिवपुराण कथेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी घ्यावा असे आवाहन आयोजक बाबुराव भोसले यांनी केले आहे. दि.९ फेब्रुवारी २०२६ सोमवार रोजी शिवपुराण कथेस प्रारंभ होणार असून दि.१६ फेब्रुवारी २०२६ सोमवार रोजी सांगता होणार आहे. दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत शिवपुराण कथा प्रवक्ते ह.भ.प. गुरुवर्य अरविंद बाबा गिरी यांच्या सुश्राव्य वाणीतून कथा श्रवणाचा लाभ भाविकांना मिळणार आहे. कथेला गायनाची साथ देण्यासाठी गायनाचार्य सुभाष महाराज आजबे, रमेश महाराज सावंत तर संगीताची साथ देण्यासाठी सिंथ वादक शिवाजी महाराज नांदे व तबलावादक लक्ष्मण महाराज गायकवाड सहभागी होणार आहेत.हरिपाठ नेतृत्व मारोती महाराज सुरवसे (सातारा)हे करणार आहेत.दि.१४फेब्रुवारी संध्याकाळी अशोक राघु करांडे यांची पंगत होणार आहे. तरी दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा, दुपारी २ ते ५ शिवपुराण कथा,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ त्यानंतर हरिजागर होणार आहे. तरी या पवित्र धार्मिक सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने घ्यावा असे आवाहन धुनकवाडचे माजी उपसरपंच तथा आयोजक बाबुराव भोसले यांनी केले आहे.

### शिर्डी येथे धनगर आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यस्तरीय बैठक

#### हजारोच्या संख्येने समाज बांधवांनी राहावे- सरपंच मोहन देवकते



**वडवणी । प्रतिनिधी**

धनगर जमातीच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाबाबत पुढील दिशा ठरवण्यासाठी ११ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी येथे भव्य एल्गार राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, या बैठकीला राज्यभरातील धनगर समाज बांधवांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान आनंदवाडी चे सरपंच मोहन नाना देवकते यांनी केले आहे .धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची लढाई आता ही अंतिम टप्प्यावर आलेली असून धनगर समाजाचे संघर्ष योद्धा दीपक भाऊ बोराडे यांच्या पाठीशी राज्यातील सकल धनगर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने पाठीशी राहावे, तत्कालीन राज्यकर्त्यांनी धनगर समाजाच्या एसटी आरक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप केलेला आहे, यामुळे राज्यभरातील धनगर समाज बांधवांनी एक समाजाची एक मोठी ताकद दीपक भाऊ बोराडे यांच्या पाठीशी निर्माण करावी, ११ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी या ठिकाणी होणाऱ्या राज्यस्तरीय बैठकीला राज्यभरातून मोठ्या संख्येने समाज बांधवांनी या ठिकाणी या बैठकीला उपस्थित राहावे असे आव्हान सरपंच मोहन देवकते यांनी केले आहे.

### ढेकणमोहा येथे माता रमाई जयंती साजरी



**ढेकणमोहा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर सेवाभावी संस्था ढेकणमोहा येथे बहुजनांची माऊली त्यागमूर्ती माता रमाई जयंती साजरी करण्यात आली या वेळी माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचे पूजन करण्यात आले. माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यागमूर्ती रमाईंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्यात सावलीसारखे राहून,अत्यंत गरिबीत व संघर्षात संसार सांभाळला. या माता रमाई जयंतीच्यानिमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी जेष्ठ महिला गंगुबाई शिंदे, व कमलबाई शिंदे, शुभांगी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी प्रमुख उपस्थिती जेष्ठ नेते हानुमान देवकते, कैलास देवकते, नागेश शिंदे, परमेश्वर थापडे (उपसरपंच) भारत देवकते (शिवसेना बीड तालुका उपाध्यक्ष), भाजपाचे नेते शामराव राऊत, नारायण देवकते (ग्रामपंचायत सदस्य) देवानंद शिंदे (ग्रामपंचायत सदस्य), शरद देवकते (ग्रामपंचायत सदस्य) गणेश कोकाटे, प्रकाश शिंदे सर ,सुदाम शिंदे ,कचराअप्पा शिंदे ,भगवान शिंदे, दराराज शिंदे ,अरविंद शिंदे ,बापुराव शिंदे ,अभिजीत शिंदे, शुभांगी शिंदे ,सुमनबाई शिंदे (ग्रामपंचायत सदस्य )निर्मला शिंदे, पदमीन शिंदे ,सोनाली शिंदे, मंगल शिंदे, कांताबाई शिंदे, कैकई शिंदे, दैवशाला साळवे, आम्रपाली शिंदे, हार्षनी शिंदे, विमल शिंदे ,शितल शिंदे, भाग्यश्री शिंदे, आसराबाई शिंदे, दोरकाबाई काळे, साक्षी शिंदे आदीची उपस्थित होते.

### लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात त्यागमूर्ती माता रमाई जयंती उत्साहात साजरी



**लिंबागणेश। प्रतिनिधी**

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धांगिनी, त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती आज शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी प्रास्ताविक केले, तर सुरेश निर्मळ यांनी आभारप्रदर्शन केले. यावेळी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष डॉ. गणेश ढवळे यांनी माता रमाई यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# राजुरी परिसरातील 8 ते 10 गावांच्या शेतीसिंचनाचा प्रश्न आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्यातून मार्गी

## वंजारवाडी तलाव आणि पाट दुरूस्तीच्या कामाला १ कोटी ७ लाखांचा निधी

**बीड । प्रतिनिधी**

वंजारवाडी लघु प्रकल्प तलाव दुरूस्ती आणि पाट दुरूस्तीच्या कामासाठी जलसंपदा विभागाकडून १ कोटी ७ लाखांच्या निधीसह मंजुरी देण्यात आली आहे. सदरील काम हे निविदास्तरावर असून लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होणार आहे. यामुळे राजुरी परिसरातील ८ ते १० गावांच्या



शेतीसिंचनाचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून हा मोठा प्रश्न मार्गी लागला आहे.

बीड तालुक्यातील वंजारवाडी लघू प्रकल्प असलेला तलावाचे काम सन १९६५ मध्ये पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाची सिंचन क्षमता ही १०५२ हेक्टर आहे. तलाव म्हणजे ▶▶ उर्वरित पान २ वर

### ●डोमरी तलावाचे पाणी वंजारवाडी तलावात आणण्यासाठीही पाठपुरावा सुरू, स्व.अजितदादांनीही दिले होते निर्देश

**मागील अनेक वर्षांपासून डोमरी तलावामध्ये अतिरिक्त असलेले पाणी वंजारवाडी तलावात वळविण्यासाठी मागणी आहे. आ.संदीप क्षीरसागर हे मागील अनेक दिवसांपासून डोमरी तलावातील अतिरिक्त (ओव्हरफ्लो) पाणी वंजारवाडी तलावात लिफ्टींगद्वारे आणण्यासाठी आणि वंजारवाडी धरणाची उंची वाढवण्यासाठी शासन आणि प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. दरम्यान सन २००७ मध्ये स्व.अजित दादा पवार जलसंपदा मंत्री असताना, डोमरी धरणातील अतिरिक्त पाणी वंजारवाडी धरणात वळवणे आणि वंजारवाडी तलावाची उंची वाढविण्याचा कामासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते.**

# पशुवैद्यकीय अधिकारी उंटावरून शेळ्या हकतात लसीकरण मोहीम ठप्प

## ग्रामीण भागात लाळ्या-खुरकूताचा प्रादुर्भाव वाढतोय ; ग्रामीण भागात भीतीचं वातावरण



**वडवणी । प्रतिनिधी**

धारुर तालुक्यातील भोगलवाडी व पहाडी पारगाव परिसरातील गावांमध्ये थंडीच्या दिवसांत पशुधनाला लागणाऱ्या लाळ्या-खुरकूत या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढत असताना प्रतिबंधात्मक लसीकरण ही अत्यावश्यक बाब आहे. वेळेत लस, टॅगिंग आणि आरोग्य तपासणी न झाल्यास हा रोग एका जनावरातून संपूर्ण कळपात झपाट्याने पसरतो. यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होऊ शकते. मात्र प्रत्यक्षात ग्रामीण भागात पशुवैद्यकीय विभागाचे कामकाज 'कागदोपत्री'च चालत असल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.पशुवैद्यकीय अधिकारी उंटावरून शेळ्या हकत असुन लसीकरण मोहीम ठप्प झाली आहे. शेतकऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार पहाडी पारगाव व भोगलवाडी परिसरातील अनेक गावांमध्ये लाळ्या-खुरकूत लसीकरण मोहीम सुरू असल्याचे दाखवले जात असले तरी प्रत्यक्षात ▶▶ उर्वरित पान २ वर

### शेतकऱ्यांची जनावरं संकटात ; पशुवैद्यकीय अधिकारी बेपत्ता

**काही भागांत गेल्या आठवड्यात लाळ्या-खुरकूताची प्रकरणे दिसून आली आहेत. रोग वेगाने पसरू नये म्हणून शासनाकडून स्पष्ट निर्देश असूनही या निर्देशांची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. टॅगिंग, तपासणी आणि लसीकरणाची कोणतीही नोंद प्रत्यक्ष कामाशी जुळत नसल्याचे शेतकरी सांगतात. शेतकऱ्यांची जनावरं संकटात पशुवैद्यकीय अधिकारी मात्र बेपत्ता असल्याचे चित्र दिसत आहे.**

### कार्यालयातच बसून कागदपत्रे माहिती भरतात

**पशुपालकांचा एकमुखी आरोप असा की, अधिकारी गावोगाव न जाता कार्यालयातच बसून कागदोपत्री माहिती भरतात तपासणी व लसीकरणासाठी कोणतीही सूचना दिली जात नाही आजारी जनावरांच्या तक्रारींवर तात्काळ प्रतिसाद मिळत नाही लसीकरण मोहिमेबाबत कोणतेही जनजागृती उपक्रम होत नाहीत अशी पशुपालकांचा एकमुखी आरोप होत आहेत.**

### दुध उत्पादनात होतेय घट...

**दुग्ध व्यवसायात दुधाळ जनावरांना निरोगी ठेवणे आवश्यक असते. दुधाळ जनावरांना कोणत्याही प्रकारच्या आजाराची बाधा झाल्यास दूध उत्पादनात घट होते. जनावरांची कार्यक्षमता कमी होते. मिळणाऱ्या उत्पादनाची प्रतही खालावते. लसीकरणामुळे जनावरांची रोग प्रतिकारशक्ती वाढते. मात्र ही रोगप्रतिकारशक्ती विशिष्ट कालावधीसाठी असते.**

## अनिल जगतापांच्या चंपावती महोत्सवातून स्व. बाळासाहेबांचे कलाकारप्रेम जिवंत: अशोकजी पटवर्धन

### चंपावती महोत्सवात बालकलाकारांच्या सुरेल सुरांचा वर्षाव ; बीडच्या रसिकांकडून उदंड प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना प्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या कलाक्षेत्राला व कलाकारांना भरभरून प्रेम दिले, त्यांना जपले आणि घडवले. हाच विचार हाडाचा शिवसैनिक असलेल्या शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून जपला आहे, असे प्रतिपादन शिवसेना



मराठवाडा विभागीय सचिव मा. अशोकजी पटवर्धन यांनी केले. चंपावती महोत्सवाच्या उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक समूह गीत गायन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या बीड जिल्ह्यात कलेचे संस्कार रुजवण्याचे काम चंपावती महोत्सवातून ▶उर्वरित पान २ वर

## पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचा माजलगाव पत्रकारांच्या वतीने सत्कार



**माजलगांव । प्रतिनिधी**

माजलगांव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांची काही दिवसांपूर्वी बदली झालेली होती ही बदली रद्द होऊन त्यांना पुन्हा माजलगाव शहर पोलीस ठाण्याचा पदभार देण्यात आला. हा पदभार स्वीकारल्यानंतर शहरवासीयांनी व सर्व स्तरातील जनतेने समाधान व्यक्त केले. शहरातील कायदा सुव्यवस्था सक्षम पणे हाताळण्याची क्षमता असणारे दबंग पोलीस निरीक्षक पुन्हा ▶▶ उर्वरित पान २ वर

# अवैध वाळू वाहतूक करणारे 2 हायवा पकडले; 50 लाखाचा मुद्देमाल जप्त

**गेवराई । प्रतिनिधी**

चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतील बोरगाव फाटा येथील गोदापात्रातून अवैध वाळूची वाहतूक होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळताच शुक्रवारी दोन हायवावर कारवाई केली. पोलिसांनी यावेळी ५० लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून चकलांबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतून अवैध वाळू उपसा केला जात असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणावर होते आहे. बोरगाव परिसरात शुक्रवारी रात्री ८ च्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेच्या टिमने पाठलाग करून दोन वाळूने भरलेल्या



हायवावर कारवाई करत एकूण ५० लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्त केला असून सर्फराज राजू पठाण वय २९ वर्ष रा. महारटाकळी ता. गेवराई जी. बीड व अशोक दत्तात्रय रकटे वय ३६ वर्ष रा.मुंगी ता. शेवगाव जि. आहिल्यानगर या दोघांवर चकलांबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई पोलिस अधीक्षक नवनित कॉवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि शिवाजी बंटेवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि खटावकर, श्री. यादव, बबन सलगर, विकास राठोड, अंकुश वरपे यांनी केली असून पुढील तपास सुरु आहे.

# राजा हरिश्चंद्र महाशिवरात्र महोत्सवाची सोमवारपासून सुरुवात

## राज्यातील नामवंत कीर्तनकारांची लाभणार हजेरी ; महंत भगवान बाबा राजपूत यांचे सुंदर नियोजन

**वडवणी । प्रतिनिधी**

भारत देशातील राजा हरिश्चंद्राचे एकमेव मंदिर असणारे ठिकाण बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे आहे. या तीर्थस्थळावर दरवर्षीप्रमाणे या वर्षीही राजा हरिश्चंद्र शिवरात्र महोत्सवाची सुरुवात सोमवार ०९ फेब्रुवारी पासून होत असून या शिवरात्र महोत्सवात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार



आहेत. या सोहळ्याची पूर्ण तयारी झाली असून बीड जिल्ह्यासह राज्यातील भाविकांनी राजा हरिश्चंद्राच्या दर्शनाचा आणि महाशिवरात्र महोत्सवातील कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन या तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांनी केले आहे. सत्यवादी, न्यायनिष्ठ राजा तसेच स्वप्नात राज्य दान देणारा दानशूर राजा म्हणून ख्याती असलेले राजा हरिश्चंद्राचे एकमेव मंदिर बीड जिल्ह्यातील वडवणी जवळील राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे आहे. या तिर्थस्थळावर संत भगवान बाबा यांनी महाशिवरात्र महोत्सवाची सुरुवात केली होती. त्यांचे उत्तराधिकारी संत भिमसिंह बाबा यांनी ही परंपरा आयुष्यभर चालवली. ▶ उर्वरित पान २ वर

### वडवणी तालुक्यातील गावकरी कार्यक्रमाचे यजमान

**राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्र हे जगभरात केवळ वडवणी तालुक्यात आहे. या तीर्थक्षेत्रावरील हा कार्यक्रम धुमधडाक्यात व्हावा या उद्देशाने वडवणी तालुक्यातील सर्व गावकरी या कार्यक्रमाचं यजमानपद घेतात. तालुक्यातील हरीचंद्र पिंपरी परिसरातील पिंपरखेड, साळींबा, मामला, कान्हापुर, लक्ष्मिपुर, देवगाव, देवडी, खळवट लिमगाव, परडी, माटेगाव, चिंचाळा, खापरवाडी, दुकडेगाव, चींचोटी, कवडगाव, मोरेवाडी, बाहेगव्हाण, वडवणी, मोरवड, तीगाव, पुसरा, कुप्पा आदी अनेक गावकरी या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी झटणार आहेत.**